महाराष्ट्र टाईम्स दि. २५/७/२०१६

फोटो - सतीश काळे



# इंटरनेट संवेदनशीलतेची जाणीव ठेवा

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

जगाला खेडे बनविणारे इंटरनेटसारखे प्रभावी माध्यम आज हातोहाती पोहोचले आहे. या माध्यमाचा सर्वाधिक मोठा प्रभाव हा युवकांवर पडतो. हे माध्यम सामाजिकदृष्ट्या अतिशय संवेदनशील असल्याने युवकांनी यात दडलेली अफाट क्षमता आणि संवेदनशीलता याची जाणीव ठेवून नितीमत्तेनेच या माध्यमाचा उपयोग करावा, असा मोलाचा सल्ला क्वीक हील फाउंडेशनचे सीएसआर हेड अजय शिर्के यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कालिदास कलामंदिरात विद्यार्थ्यांसाठी 'सायबर सिक्युरिटी' या विषयांतर्गत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. शिर्के म्हणाले, 'तंत्रज्ञानाला दोन बाजू आहेत. तंत्रज्ञान हे स्वत: अलिप्त आहे. त्याच्या वापरकर्त्यावर त्याची दिशा अवलंबून असल्याने होणाऱ्या परिणामांची जबाबदारी या देशाचे सुजाण नागरिक या नात्याने पहिल्यांदा आपली स्वत:ची आहे. याची जाणीव प्रत्येकाने ठेवून तंत्रज्ञानाच्या केवळ विधायक वापरावरच भर द्यायला हवा', असे आवाहनही त्यांनी केले.

**अजय शिर्के यांचा विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला**

### शिकता शिकता कमाविण्याचीही संधी

आयोजक क्वीक हिलच्या वतीने 'कमवा व शिका' या योजनेंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी सायबर सिक्युरिटीचे प्रबोधन वर्गही पुढील टप्प्यात आयोजित करण्यात येणार आहेत. या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांनी विविध शाळांमध्ये जाऊन सायबर सिक्युरिटी या विषयावर प्रेझेंटेशन द्यायचे आहे. यासाठी त्यांना योग्य मानधनही देण्यात येणार आहे. या उपक्रमाविषयी विद्यार्थ्यांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी गंगापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राजेंद्र कुटे यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना 'सायबर सिक्युरिटी' या विषयाची कायदेशीर बाजू सांगितली. तसेच उपस्थित तज्ज्ञांनी सिक्युरिटी एथिकल हॅकिंग, समाजमनावर या माध्यमाचे होणारे दुष्परिणाम, समुहांमधील तेढ, आपसात द्वेषभाव पसरविणे, आर्थिक फसवणूक, डिजिटलायझेशन आदी विषयांसंदर्भात युवकांना माहिती देऊन कायद्याविषयी सजग करण्यात आले.